# क. ज. सोमय्या पॉलिटेक्निक, मुंबई

**विद्यार्थीमंच (Students' Forum)**

दिनांक: १४ नोव्हेंबर २०२५

## सूचना (NOTICE)

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या कडून प्राप्त पत्रा नुसार **१५ नोव्हेंबर** हादिवस "**जन जाती गौरव दिन**" म्हणून साजरा करण्यात येणार आहे. हा दिवस **भगवान बिरसा मुंडा** यांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्याचा, आदिवासी समाजासाठी केलेल्या योगदानाचा आणि देशासाठी दिलेल्या प्रेरणादायी नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी साजरा केला जातो.

सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्गआणि कर्मचारी यांनी या कार्यक्रमात सक्रीय पणे सहभागी व्हावे, अशी विनंतीआहे.

कार्यक्रमाची सविस्तर माहिती व वेळापत्रक लवकरच कळविण्यात येईल. आपला सहकार्य पूर्ण सहभाग अपेक्षित आहे.

**भगवान बिरसा मुंडा – थोडक्यात माहिती**

भगवान बिरसा मुंडा (१८७५–१९००) हे भारतातील महान आदिवासी स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक सुधारक आणि मुंडा जमातीचे प्रेरणादायी नेते होते. त्यांना **"धरतीआवा"** म्हणून मान दिला जातो. त्यांनी ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध आणि आदिवासी समाजावर होणाऱ्या शोषणा विरुद्ध **"उलगुलान"** ना वाचा जन आंदोलन उभारले. जनतेला स्वच्छता, एकजूट, श्रम आणि नशा मुक्तीचा संदेशदिला.

फक्त **२५वर्षांच्या** अल्पायुष्यात त्यांनी आदिवासीहक्क, जंगल-जमिनीवरील अधिकार आणि स्वाभिमानासाठी लढा दिला.

बिरसा मुंडा हे आपल्या जिद्दीचे, नेतृत्वाचे आणि बलिदानाचे अमर प्रतीकआहेत.

अध्यक्ष, विद्यार्थीमंच (Chairperson, Students' Forum)
क. ज. सोमय्या पॉलिटेक्निक, मुंबई

B. R. 14/11/25

श्रीमती पद्मजाभानू बंडारू
प्राचार्य, क. ज. सोमय्यापॉलिटेक्निक, मुंबई

प्रति: सर्व विभागप्रमुख, सूचना फलक, श्रीमती उ. सो. कोलते — वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी